# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक :- अश्रूंचेही होईल गाणे
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. मधुरा राणे साळुंखे

आळस, मरगळ झटकून सारे सूरांत झोकून दे प्रेमाने
दु:ख तुझे बघ शमेल आणिक अश्रूंचेही होईल गाणे

शब्द, अक्षरे साऱ्यांआधी असेल झाला जन्म स्वरांचा
अनेकरंगी अगम्य भाषा रंग एक परी सूर-तालांचा
चराचरांतून या सृष्टीच्या सूरच भरले रे देवाने
दु:ख तुझे बघ...

थकवा कसला, कसली चिंता ? सरगम रे आधार मनाचा
हवीत कशाला फसवी व्यसने ? वरदहस्त तुज वाग्देवीचा
झुरणे, कुढणे विरून जाईल, संपतील सारेच बहाणे
दु:ख तुझे बघ...

धमन्यांमधूनी तुझ्या माझिया अखंड वाही जीवनगाणे
ताल तयाला देण्यासाठी हृदय धडधडे आनंदाने
देह तुझा रे सप्तसूरांचा श्वासही गाती धुंद तराणे
दु:ख तुझे बघ...

Anahat Music Therapy